# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्वीकृतीच्या मुदत वाढीबाबत...

संदर्भ:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा. क्रमांक:१७/ तांशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/१०१, दि.०१/११/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेच्या शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्वीकृती तसेच पडताळणीकरिता मुदत वाढ देण्यात आली आहे.

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून विहित कालमर्यादेत महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी. याअनुषंगाने येणाऱ्या अडचणी, केलेला पाठपुरावा व कार्यवाही याची सर्व महाविद्यालयांनी इत्यंभूत नोंद ठेवावी.

आदेशान्वये
(स्वाक्षरी)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ ७०३
दिनांक - 08 NOV 2021

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/१०१ दिनांक : 01 NOV 2021

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६८/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३ व ६४, दिनांक २१ सप्टेंबर, २०२१

३) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून,संदर्भाधिन दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताची जाहिरात दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक २ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणून सदरची कालमर्यादा वाढवून आता online पद्धतीने अर्ज करण्याची कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक २ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यांत येत आहे.

तसेच उपरोक्त वेळापत्रकानुसार सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी तंत्रशिक्षण संचालनालयात हस्तदेय जमा करण्यांत यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती

# उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. २१ सप्टेंबर २०२१ ते दि. ९ नोव्हेंबर २०२१ ( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. २३ सप्टेंबर २०२१ ते दि. १० नोव्हेंबर २०२१ (सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |